(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधीजींचे सामाजिक परिवर्तन विषयक विचार

**प्रा. चिन्मयी प्रताप सांगळे**, इतिहास विभाग समन्वयक, कमला कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

प्राचीन भारतीय संस्कृती ही जगातील सर्वश्रेष्ठ संस्कृतींपैकी एक आहे .पण अशा या सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या संस्कृतीमध्ये काळाच्या ओघात अनेक बदल होत गेले. प्राचीन काळात स्त्रियांना पुरुषांसोबत असणारे हक्क बदलून त्यांचे रूपांतर पुरुषप्रधान संस्कृतीत झाले आणि स्त्रियांना दुय्यम समजले जाऊ लागले. जसे स्त्री-पुरुषांचे समाजात असणारे स्थान बदलले तसेच समाज व्यवस्था ही बदलत गेली. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यांचा पगडा समाज जीवनावर इतका खोलवर रुजू लागला की माणसांपेक्षा जातीव्यवस्थेला अधिक महत्त्व दिले जाऊ लागले.

या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे अनेक अनिष्ट अशा रुढी आणि परंपरांचा झालेला उदय, ज्यामुळे भारतीय समाजव्यवस्था अज्ञानाच्या आणि अंधश्रद्धेच्या गर्तेत ढकलली गेली. गर्तेतून भारतीय समाजाला वरती काढण्याचे काम अनेक समाजसुधारकांनी केले त्यामध्ये राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती महादेव रानडे, महात्मा ज्योतिबा फुले, नामदार गोखले, महात्मा गांधी इत्यादी होते.

महात्मा गांधींचे व्यक्तिमत्व आपल्याला दिसताना जरी राजकीय नेते असे दिसत असले, तरी राजकीय कार्य हे समाज परिवर्तनाचे साधन असते हे विसरता कामा नये. महात्मा गांधीजींचे आयुष्य अनेक प्रसंगांनी गुंतागुंतीची असल्याचे भासते उदा. त्यांचा असणारा वर्णाश्रम व्यवस्थेचा पुरस्कार.

यामुळे त्यांना अनेक इतिहासकार, संशोधक, राजकीय नेते हे प्रतिगामी समजतात. पण गांधीजींच्या जीवनाचे एकेक पैलू जसजसे आपण उलगडत जाऊ तसतसे आपल्यासमोर त्यांचे सामाजिक सुधारणावादी असणारे विचार समोर येतात त्यामध्ये धर्मनिरपेक्षता वाद ,जातीव्यवस्था निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, स्त्री सुधारण्याचे कार्य, शिक्षणासंबंधीचे कार्य या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांवर आणि कार्यांवर दृष्टीक्षेप टाकणार आहोत.

**गांधीजींचे धर्मनिरपेक्षतावाद विषयक विचार**

भारतीय समाज अनेक धर्म, जाती, पंथ, भाषा यामध्ये विभागला गेलेला आहे. या सर्वांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम समाजसुधारकांनी केले. त्यामध्ये महात्मा गांधीजींचे धर्मनिरपेक्षतावादी विचार महत्त्वपूर्ण आहेत. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्माला सामाजिक, राजकीय ,आर्थिक जीवनापासून वेगळे ठेवणे होय. त्यामुळे मानवी जीवनातील भेदभाव टाळून समतेकडे वाटचाल करता येते. पण याचा अर्थ मनुष्याने नास्तिक होणे असा होत नाही, तर सर्वधर्म समभाव असा होतो. महात्मा गांधीजींच्या धर्म कल्पनेवर रामकृष्ण परमहंस यांच्या धर्मविषयक विचारांचा असणारा प्रभाव जाणवतो. परमहंसांच्या मते, "जगातील सर्वच धर्म अत्यंत खरे असून आपण एकाच वेळी सर्व धर्माचे अनुयायी आहोत." याच विचारांचा विकास महात्मा गांधीजींनी केलेला दिसून येतो. धर्मातील मतभेद दूर करण्यासाठी नवा धर्म स्थापन करणे त्यांना मान्य नव्हते गांधीजींच्या मते, "चांगला हिंदू होण्याच्या प्रयत्नात मी आपोआपच चांगला ख्रिश्चन, मुसलमान व बुद्ध होत आहे. यामुळे इतर सर्व धर्माचे संत व नेते आपोआपच माझे."

सर्व धर्मांना समान मानण्याच्या आणि सर्वांमध्ये समता प्रस्थापित करण्याच्या विचारांमुळे भारतीय समाजावर धर्माच्या बाबतीत अनुकूल असा परिणाम झालेला दिसून येतो, तो म्हणजे इतर धर्मांचा केला जाणारा आदर. यामुळेच भारताला जरी स्वातंत्र्य मिळाले तरी ते जास्त दिवस एक देश म्हणून एकत्र राहू शकणार नाहीत असे मत मांडणाऱ्या परकीयांच्या डोळ्यात अंजन घालून आज भारत मोठ्या अभिमानाने धर्मनिरपेक्षतावादी तत्त्वावर उभा आहे. गांधीजींचा जगातील सर्व धर्मांचा अभ्यास असल्याने त्यांच्या जीवनातील एकादश व्रतांवर सर्वधर्मांचा प्रभाव असल्याचे जाणवते. 'सत्य आणि अहिंसा' या बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे आचरण बुद्धानंतर मोठ्या प्रमाणात जगातील कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे कार्य महात्मा गांधीजींनी केले, तसेच 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' हे ख्रिस्ती धर्माचे तत्व ही गांधीजींच्या जीवनाचा प्रमुख भाग होता. राम राज्याच्या कल्पनेबाबत गांधी लिहितात, मी रामराज्याचा अर्थ हिंदुराज्य असा समजत नाही. माझ्यासाठी राम आणि रहीम हे दोन्हीही सारखेच आहेत. सत्य आणि सद्गुणांव्यतिरिक्त मी दुसऱ्या कुठल्याही देवाला मानत नाही." (१९ सप्टेंबर १९२९, यंग इंडिया)

**महात्मा गांधीजींचे जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता निर्मूलनाचे प्रयत्न**

गांधीजी सुरुवातीच्या काळात जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते, त्यामुळेच त्यांच्याकडे

बघण्याचा दृष्टिकोन प्रतिगामी स्वरूपाचा होता. पण गांधीजींचे समर्थन हे माणसांमधील भेदभावाला नसून ते व्यवसायावर आधारित स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्थेला होते. परंतु प्रत्येक व्यक्तीला कोणताही व्यवसाय करण्याचा हक्क आहे असे ते मानत होते. त्यानंतर मात्र जातीव्यवस्थेची कठोर होत चाललेली बंधने आणि दुय्यम समजल्या जाणाऱ्या जातींभोवती आवळला गेलेल्या अस्पृश्यतेच्या फासाने गांधी अस्वस्थ झाले. अस्पृश्यतेबाबत बोलताना गांधीजी म्हणत, "अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे ही घाण वस्तू बाहेर फेकून देण्याच्या लायकीचे आहे." अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या कार्यामध्ये महत्त्वाचे कार्य म्हणजे अस्पृश्य शब्दऐवजी त्यांनी हरिजन हा शब्द वापरला. महात्मा गांधी स्वतःस वैष्णव जन मानत. त्यातूनच त्यांनी हरिजन म्हणजेच वैष्णव /हरीला प्रिय असणारे असा आदरणीय शब्द प्रयोग केला. अस्पृश्यांना सार्वजनिक जीवनात सवर्ण हिंदू इतकेच राजकीय, सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक हक्क मिळाले पाहिजेत असा आग्रह गांधीजींचा होता. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी तसेच मंदिरांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न केले. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचा असणारा राजकीय हक्क मतदानाचा हक्क अस्पृश्यांना मिळावा यासाठी आग्रह धरला आणि विधिमंडळात राखीव जागा ठेवण्याचे मान्य केले. जातिभेद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले.

**स्त्री जीवन सुधारण्याचे कार्य**

अस्पृश्यांसारखेच स्त्रियांचे समाजामध्ये दुय्यम स्थान होते. समाजामध्ये त्यांचे असणारे स्थान हे एखाद्या गुलामाप्रमाणे होते. पुरुषप्रधान संस्कृतीच्या बळी ठरलेल्या स्त्रीयांचे जीवन स्वतंत्र आणि मुक्त झाले पाहिजे, या दृष्टिकोनातून गांधीजींनी स्त्री जीवन सुधारण्याचे कार्य हाती घेतले. त्यामध्ये त्यांनी स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांना समाजामध्ये आदराचे जीवन जगता यावे यासाठी प्रयत्न केले. चार भिंतींच्या आत असणाऱ्या स्त्रियांना राजकारणाचा भव्य क्षेत्रात उतरवून स्त्रीशक्ती जागृत केली. अनेक चळवळींचे नेतृत्व स्त्रियांकडे देऊन स्त्रिया घरासोबत देशाचेही नेतृत्व करू शकतात हे दाखवून दिले.

**शैक्षणिक क्षेत्रातील गांधीजींचे विचार**

शिक्षणामुळे व्यक्तीची आणि त्यासोबत समाजाची ही प्रगती होत असते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा या गोष्टीतील फरक शिक्षणामुळे लक्षात येतो. तसेच स्वतःच्या माणूस म्हणून असणाऱ्या हक्कांची जाणीव व्यक्तीला होते. त्यासाठी गांधीजींनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, वर्धा येथे भरलेल्या शैक्षणिक परिषदेमध्ये आपले शिक्षण विषयक विचार मांडून 'वर्धा योजना' सुरू केली जी गांधीजींची शिक्षण पद्धती म्हणून ओळखली जाते . सामाजिक समतेसाठी गांधीजींनी नैतिक शिक्षणावर भर दिल्याचे दिसून येते. स्त्री शिक्षण प्रौढांना शिक्षण तसेच लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातून स्वयंनियंत्रणाचे योग्य वयात शिक्षण देण्याचा आग्रह धरला जेणेकरून तरुण पिढी वाम मार्गाला जाणार नाही.

**निष्कर्ष**

गांधीजी हे मतपरिवर्तनापेक्षा हृदय परिवर्तनाला अधिक महत्त्व देत होते. त्यामुळेच समाजामध्ये होणारे बदल हे जबरदस्तीने किंवा कायद्याच्या धाकाने करून न घेता ते स्वेच्छेने घडून यावे, यासाठी गांधीजी प्रयत्न करत होते. त्यांच्या जीवनात असणाऱ्या राजकीय कार्य इतकेच महत्त्व त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला ही आहे.आज अमृत महोत्सव वर्षात पदार्पण करत असताना भारताच्या झालेल्या प्रगतीमध्ये आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जीवन जगण्यास उपयुक्त असे गांधीजींचे विचार आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

१) गांधी,मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, २००५, अनुवाद सी यु पटवर्धन

२) गांधीजी आणि सामाजिक समता ,संपादक प्रा. श्रीराम जाधव, प्रकाशक, महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद ४३१००१

३) गांधींविषयी, गांधी : जीवन आणि कार्य, संपादक किशोर बेडकीहाळ, सेवाग्राम कलेक्टिव आणि साधना प्रकाशन,पुणे

४) पब्लिकेशन डिव्हिजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, दि कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड १९ ते ६९ दिल्ली